**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,**
**५३९, कसबा करवीर, राजेंद्र नगर, कोल्हापूर - ४१६ ००४.**
**ई-मेल: divsec.kop@gmail.com**

तातडीचे /महत्वाचे/परीक्षा प्राधान्य

क्र.कोविमं/आस्थापना/ ४००.
दिनांक : 25 MAY 2023

प्रति,

१) मा. संचालक,
आकाशवाणी केंद्र.
सातारा/सांगली/कोल्हापूर

२) व्यवस्थापक,
रेडिओ मिरची व टोमॅटो एफ.एम. कोल्हापूर

३) मा. संचालक,
बी न्यूज व एस. न्यूज, कोल्हापूर.

४) मा. संचालक,
दैनिक पुढारी/सकाळ/तरुण भारत/लोकमत/महासत्ता/केसरी पुण्यनगरी/
महाराष्ट्र टाईम्स/ ऐक्य
सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय - फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी)परीक्षेच्या निकालानंतर राज्यमंडळ स्तरावर नियुक्त केलेल्या समुपदेशकांचे समुपदेशन सेवा सुरु ठेवण्याबाबत...**

महोदय,

फेब्रुवारी- मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल आज दि.२५/०५/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता जाहिर झाला आहे. ऑनलाईन निकालाच्या दिवसापासून राज्यमंडळ स्तरावर समुपदेशकांचे समुपदेशन सेवा ०८ दिवस सुरु ठेवण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्हा आवृत्तीमधून आणि आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्याच्या वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत : प्रकटनाची प्रत.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या निकालानंतर राज्यमंडळ स्तरावर नियुक्त केलेल्या समुपदेशकांचे समुपदेशन सेवा सुरू ठेवण्याबाबत...

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) ची लेखी परीक्षा दिनांक-२१/०२/२०२३ ते दिनांक-२१/०३/२०२३ या कालावधीत पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात आली होती.

सदर परीक्षेचा निकाल दिनांक-२५/०५/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. निकालानंतर काही विद्यार्थी नकारात्मक विचाराने मानसिक दडपणाखाली येण्याची शक्यता असते. राज्यमंडळ स्तरावरून अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन सेवा सुरू ठेवण्यात येत आहे. सदर समुपदेशकांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

१) ७३८७४००९७० २) ८३०८७५५२४१ ३) ९८३४९५१७५२ ४) ८४२११५०५२८

५) ९८०४६८२७१६ ६) ९३७३५४६२११ ७) ८९९९९२३२२१ ८) ९३२१३१५९२८

९) ७३८७६८३७९०२ १०) ८७६७७५५२०६१

उपरोक्त भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले समुपदेशक परीक्षेच्या निकालाच्या दिवसापासून ८ दिवस सकाळी ८-०० ते रात्री ८-०० या वेळेत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीव्दारे निशुल्क आवश्यक ते समुपदेशन करतील याची विद्यार्थी, पालक यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४